MAHARASHTRA ACT No. LII OF 1974.

THE MAHARASHTRA SPECIAL PROVISION FOR PAYMENT OF STAMP DUTY (No. 2) ACT, 1974.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ९ ऑक्टोबर १९७४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. डब्ल्यू. धुरंधर,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

MAHARASHTRA ACT No. LII OF 1974.

AN ACT TO MAKE TEMPORARY PROVISION FOR THE COLLECTION OF THE STAMP DUTY CHARGED OR CHARGEABLE UNDER THE INDIAN STAMP ACT, 1899 AND THE HYDRABAD STAMP ACT, 1331 F, OTHERWISE THAN BY STAMPS.

[ राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १६ ऑक्टोबर १९७४ रोजी प्रथम ( इंग्रजीत ) प्रसिद्ध केलेला. ]

**सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.**

**भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ आणि हैदराबाद मुद्रांक अधिनियम, १३३१ फसली, यांन्वये आकारले जाणारे किंवा आकारण्याजोगे मुद्रांक शुल्क, मुद्रांकांखेरीज अन्य रीतीने वसूल करण्यासाठी तात्पुरती तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ व हैदराबाद मुद्रांक अधिनियम, १३३१ फसली, यान्वये आकारले जाणारे किंवा आकारण्याजोगे मुद्रांक शुल्क, मुद्रांकांखेरीज इतर रीतीने वसूल करण्यासाठी तात्पुरती तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्यांच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र, मुद्रांक शुल्क प्रदानासंबंधी विशेष तरतूद करणारा (क्रमांक २) अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व कालावधी.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात असण्याचे बंद होईल; व हा अधिनियम अंमलात असण्याचे बंद झाल्यावर, तो जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आल्याप्रमाणे, मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ चे उपबंध त्यास लागू होतील.

विवक्षित कालावधी-साठी मुद्रांकाऐवजी पावत्या व चलाने यांचा वापर करण्यास परवानगी असणे.

२. (१) हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ हा मुंबई क्षेत्रास आणि महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागास लागू करताना, त्यांच्या कलम ३ अन्वये आणि हैदराबाद मुद्रांक अधिनियम, १३३१ फसली, याच्या कलम ३ अन्वये आकारण्याजोगे मुद्रांक शुल्क, ते अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांत एतद्विरुद्ध काहीही असले तरी शासकीय कोषागारात रोख रकमेत जमा करता येईल आणि त्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून त्यासाठी पावती किंवा चलान रीतसर दिले जाईल. नंतर अशी पावती किंवा चलान हे (या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेला मुद्रांक विक्रेता असणाऱ्या) मुद्रांक विक्रेत्याकडे, ज्या लेखासंबंधात रोख रकमेत मुद्रांक शुल्क देण्यात आले असेल त्या लेखासह देण्यात येईल. अशी पावती किंवा चलान पुन्हा वापरणे शक्य होऊ नये म्हणून मुद्रांक विक्रेता, मुद्रांक शुल्क रोखीने भरण्यात आले असल्याबद्दल यथोचित पडताळणी केल्यानंतर पावती किंवा चलान रद्द करून लेखावर पुढील अर्थाचे पृष्ठांकन करील :—

"पावती/चलान क्र. . . . . . . . . .

दिनांक . . . . . . . . . . . . अन्वये

रु. . . . . . . . . . . मुद्रांक शुल्क रोख रकमेत दिले.

मुद्रांक विक्रेत्याची सही."

(२) पोट-कलम (१) अन्वये पृष्ठांकन केलेला लेख, यथोचितपणे मुद्रांकित असल्याचे मानण्यात येईल आणि तो, उक्त मुद्रांक अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्या प्रयोजनासाठीदेखील वापरता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, "शासकीय कोषागार" या शब्दप्रयोगात शासकीय उप-कोषागार, सर्वसाधारण मुद्रांक कार्यालय, मुंबई आणि राज्य शासन, याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल असे कोणतेही इतर ठिकाण यांचा अंतर्भाव होईल.

(यथार्थ अनुवाद)

**वा. स. कुलकर्णी,**
**भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.**